कला अकादमी गोवा
पणजी-गोवा
कअ/काविवि/कोनास्प/२०१९-२०/३१४६
दि.२८/११/२०१९

## कृपया प्रसिध्दीसाठी

कला अकादमी आयोजित यंदाच्या ४४ व्या राज्यस्तरीय कोंकणी नाटयस्पर्धेत सहभागी होऊ इच्छिणाऱ्या सर्व नोंदणीकृत संस्थानी आपल्या प्रवेशिका दाखल करण्याची शेवटची तारीख दि. १२ डिसेंबर २०१९ ही आहे. स्पर्धेतील सादरीकरणाचा अनुक्रम त्याचदिवशी सायं.५.०० वाजता सर्व संस्था प्रतिनिधींच्या समक्ष चिठ्ठया टाकून ठरविण्यात येईल. त्यानंतर प्रवेशिका मागे घेण्यासाठी १० दिवसांची मुदत असून या निर्धारित मुदतीनंतर प्रवेशिका मागे घेता येणार नाही.

इच्छुक नाटयसंस्थानी आपल्या प्रवेशिकेसोबत प्रवेशशुल्क रु.५००/-(रुपये पाचशे मात्र) व अनामत रक्कम म्हणून रु.५०००/-(रुपये पाच हजार मात्र) अकादमीकडे भरणे आवश्यक आहे. सदर रक्कम कार्यालयीन कामकाजाच्या दिवशी रोज सकाळी १० ते दुपारी १.०० व सायं. २.०० ते ४.३० या कालावधीत स्वीकारली जाईल याची सर्व संबंधितानी नोंद घ्यावी. १८६० च्या कायद्याखाली नोंदणी व नूतनीकरण झालेल्या संस्थानाच या स्पर्धेत सहभागी होता येईल. प्रवेशिका दाखल करतेवेळी सदर संस्था नोंदणी अथवा नूतनीकरणाची साक्षांकीत प्रत सोबत जोडणे अनिवार्य आहे याची सर्व संस्थानी नोंद घ्यावी.

कोंकणी नाटयस्पर्धेचे नियम व अटी तसेच विहित नमुन्यातील प्रवेशिका कला अकादमीच्या कार्यक्रम व विकास विभागात विनामूल्य उपलब्ध आहेत. तरी या अंतिम मुदतीची नोंद घेऊन सर्व इच्छुक नाटयसंस्थानी आपल्या प्रवेशिका निर्धारित मुदतीत दाखल कराव्यात असे अकादमीतर्फे कळविण्यात आले आहे.

(डॉ. दत्तगुरु आमोणकर)
कार्यक्रम व विकास अधिकारी

प्रति

१.गोमंतक २.नवप्रभा ३.तरुण भारत ४.पुढारी ५.गोवा दूत ६.लोकमत ७.हेराल्ड ८.गोवन वार्ता, तिसरा मजला, फोर्थ इस्टेट (कामत मेट्रोपॉलीस),सांतईनेज,पणजी ९.आकाशवाणी
१०. भांगरभुय

११.लेखा अधिकारी,कला अकादमी गोवा

एसझ ड/एसएस